# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

मध्यवर्ती कार्यालय : हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी, मुंबई -४०००१३.
दूरध्वनी : ०२२ – २४३२२६८०८ ईमेल : mlwbcivil@gmail.com


---

जा.क्र.सीओ/बांधकाम/२०२१-२२/१५९ दिनांक : २०/०९/२०२१

## जाहीर प्रकटन

**<u>विषय : कामगार क्रीडा भवन, मुंबई येथील मैदानातील वाढलेले गवत कापण्याबाबत.</u>**

संदर्भ : १) जा.क्र.स्टेडीयम/आस्था/२०२१-२२ दि.०९.०८.२०२१
२) मा.कल्याण आयुक्तांनी दि.१९/०९/२०२१ रोजी मान्य केलेली टिप्पणी.

मंडळाच्या हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई - ४०००१३ येथील मैदानातील गवत कापण्याच्या कामासाठी खालील अटी व शर्तीनुसार ठेकेदारांकडून बंद लिफाफ्यात दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

१) ठेकेदार संस्थेने गवत कापणे, मैदानातील गवतावर तणनाशक फवारणे व कापलेले गवत स्वखर्चाने मुंबई शहराच्या हद्दीबाहेर नेणे या ही कार्यवाही करावयाची आहे.
२) ग्रास कटर मशिन किंवा विळ्याच्या सहाय्याने गवत कापणे आवश्यक आहे. मैदान असमतल करतील अशी यंत्रे उदा.जेसीबी गवत काढण्यासाठी वापरु नये.
३) कार्यादेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत वरील नमूद कामे ठेकेदाराने पूर्ण करणे आवश्यक आहे.
४) वरील नमूद कामे पूर्ण झाल्यानंतर कार्यादेशात नमूद रकमेतील ७० टक्के रक्कम ठेकेदारास अदा करण्यात येईल.
५) कार्यादेश मिळाल्यापासून ६ महिन्याच्या आत किंवा मंडळ सांगले तेव्हा दुसऱ्यांदा मैदानातील गवतावर तणनाशक फवारणे व गवत मुंबई शहराच्या हद्दीबाहेर स्वखर्चाने नेण्याचे काम ठेकेदारास करावे लागेल. सदर काम पूर्ण झाल्यानंतर ठेकेदारास देयकाची उर्वरित ३० टक्के रक्कम अदा करण्यात येईल.
६) दरपत्रक सादर करण्यापुर्वी संबंधित ठेकेदारांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी पाहणी करुन घ्यावी. त्यानंतरच दरपत्रक सादर करावेत. दरपत्रकात सर्व करांसहित रक्कम नमूद करावी.
७) इच्छुक संस्थांनी दरपत्रकासोबत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, जीएसटी इत्यादी आवश्यक कागदपत्रे जोडावीत.
८) उपरोक्त नमूद कार्यालयीन पत्यावर दि.२८/०९/२०२१ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात दरपत्रक सादर करावेत. प्राप्त दरपत्रके दि.२८/०९/२०२१ रोजी दुपारी ३.३० वाजता उघडण्यात येतील.

९) प्राप्त दरपत्रके स्विकारणे, तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता दरपत्रक नाकारण्याचा / रद्द करण्याचा अधिकार मंडळ प्रशासनास राहील.

मा.कल्याण आयुक्तांच्या मान्यतेने.

प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी
अति. कार्यभार (स्थापत्य अभियंता)